# नाशिक महानगरपालिका, नाशिक

पर्यावरण विभाग
जा.क्र.मनपा/पर्या/कार्यरान-१/ /२०१८
दिनांक : /०७/२०१८

विषय :- मा.मुंबई उच्च न्यायालय येथे दाखल जनहित याचिका क्र. १७६/२०१२ बावत दि. १४/०५/२०१८ रोजीचे बैठकीचे इतिवृत्त.

मा.मुंबई उच्च न्यायालय येथे जनहित याचिका क्र. १७६/२०१२ "राजेश पंडित व इतर विरुध्द नाशिक मनपा व इतर" दाखल आहे. सदर याचिका गोदावरी नदीच्या व तीच्या उपनद्यांचे पुनरुज्जीवन संदर्भात आहे. सदर याचिके मध्ये मा.उच्च न्यायालयाने "निरी" या संस्थेस सल्लागार नेमले आहे.

सदर याचिके मध्ये मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी विविध आदेश पारित केले आहे. तसेच "निरी" ने देखील विविध शिफारशी सादर केल्या आहेत. मा. उच्च न्यायालयाचे आदेश तसेच निरीने दिलेल्या शिफारशी यांची अंमलबजावणीच्या सद्यस्थिती बावत माहिती घेण्यासाठी मा.आयुक्त सो. यांनी दि. १४/५/२०१८ रोजी बैठक बोलावली होती.

सदर बैठकी मध्ये खालील अधिकारी उपस्थित होते.

१) मा.आयुक्त सो. नाशिक मनपा, नाशिक.
२) मा.श्री.राकेशकुमार, संचालक, निरी
३) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ
४) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
५) तज्ञ सदस्य, डॉ. श्रीमती. प्राजक्ता बस्ते.
६) याचिकाकर्ते श्री.राजेश पंडित
७) याचिकाकर्ते श्री. निशिकांत पगारे
८) पर्यावरण क्षेत्रातील श्रीमती.वैशाली बालाजीवाले
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक स्मार्ट सिटी.

त्याच बरोबर मनपाचे श्री.एस. व्ही. घुगे, अधि.अभि, (सार्व.आरोग्य अभि.(मलनि) विभाग) श्री. एस. आर. बंजारी, कार्यकारी अभियंता (पर्यावरण), श्री.पी. बी. चव्हाण, कार्यकारी अभियंता, नगरनियोजन विभाग, डॉ.हिरे, संचालक घनकचरा व्यवस्थापन विभाग उपस्थित होते.

सदर बैठकीत पुढील प्रमाणे मुद्यांवर चर्चा करण्यात आली.

मा.आयुक्त सो. यांनी बैठकीची सुरूवात करतांना सांगितले की, गोदावरी व तिच्या उपनद्यांचे पुनरुज्जीवन करणेकामी नाशिक मनपा कटीवध्द असुन गोदावरी नदीचे पौराणिक महत्व लक्षात घेऊन, व नाशिक शहराचे अर्थकारण व शाश्वत विकास हा गोदावरी नदीच्या प्रदुषण मुक्ती वर आधारलेला असल्याने, गोदावरी व तीच्या उपनद्या पुनरुज्जीवीत करण्यासाठी व तीचे प्रदुषण

टाळण्यासाठी नाशिक मनपा सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. स्मार्ट सिटी योजनेंतर्गत गोदावरी नदीचे सौन्दर्यीकरण करतांना प्रदुषण मुक्तीसाठी विविध उपक्रमांचा अंतर्भाव केलेला आहे.

याचिकाकर्ते श्री.राजेश पंडित यांनी नमुद केले की, सदर जनहित याचिका ही गंगापूर धरण ते नांदूर मध्यमेश्वर पर्यंत गोदावरी खोऱ्याबाबत आहे. तसेच सन २०१२ साली जेव्हा याचिका दाखल केली होती त्यावेळची गोदावरी नदीची परिस्थिती पेक्षा आजची परिस्थिती खुप मोठ्या प्रमाणावर सुधारलेली असुन नाशिक मनपा करत असलेल्या उपाय योजनांची त्यांनी सकारात्मक दखल घेतली व निरीच्या सर्व सुचना, मा. उच्च न्यायालयाचे सर्व आदेश तसेच मा.विभागीय आयुक्त साहेब यांच्या समितीने वेळोवेळी केलेले आदेश यांचे पालन व्हावे अशी आशा व्यक्त केली. निरीच्या सुचनांच्या व्यतिरिक्त मा.उच्च न्यायालयाचे तसेच मा.विभागीय आयुक्त साहेबांच्या समितीने दिलेले आदेशांचे सादरीकरण केले. याचिकाकर्ते श्री. निशिकांत पगारे यांनी नमुद केले की, नाशिक शहरातील नैसर्गिक नाल्यांमधुन वाहणारे मलजल बंद करावे, याबर मा. आयुक्त सो. यांनी सांगितले की, या बाबत आवश्यक ती कार्यवाही करणेत येत आहे.

"निरी" चे संचालक डॉ. राकेश कुमार यांनी सांगितले की, सदर याचिके अंतर्गत कुंभ मेळया पुर्वी गोदावरी पुनरुज्जीवन संदर्भात त्यांनी विविध शिफारशी केल्या आहेत व त्या सर्व शिफारशींची नाशिक मनपाने चांगल्या पध्दतीने अंमलबजावणी केली आहे. तसेच नाशिक मनपाचे मलशुध्दीकरण केंद्रे चांगल्या पध्दतीने प्रक्रियेचे काम करत असुन देशातील मोजक्या शहरा मधील चांगली कामगीरी करणाऱ्या मलशुध्दीकरण केंद्रां मध्ये नाशिकचा अंतर्भाव आहे असे सांगितले. प्रक्रिया झालेल्या सांडपाण्याचा BOD 10 mg/lit च्या खाली आणणे बाबत चर्चा केली.

श्रीमती.वैशाली बालाजीवाले यांनी सांगितले की, रामकुंड परिसरातील (Holy Stretch) जीवरक्षकांची मदत घेण्यात यावी, व स्थानिक Stakeholders ना विश्वासात घ्यावे आणि प्रबोधनाचे काम करण्यांत यावे.

मा.आयुक्त सो. यांनी घन कचरा व्यवस्थापनाचे श्री. डॉ. हिरे यांना निर्देश दिले की यापुढे पानवेली काढतांना व नदीची स्वच्छता विषयक अंमलबजावणीचे नियोजन किंवा प्राकलन करतांना सदर जीवरक्षकांची मदत आपल्या कामात अंतर्भुत करावी.

त्यानंतर मा. विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षते खालील समितीने मा. शासनास तसेच मा.उच्च न्यायालयात सादर केलेला पुर रेषा अहवाल (Flood Line Report) या बाबत चर्चा झाली. तसेच इथुन पुढे गोदावरी व तिच्या सर्व उपनदया यांच्या बाबत कुठलेही रिटेनिंग वॉलचे बांधकाम हे "गॅबीयन" पध्दतीने करणेबाबत निर्देश दिले. मा. आयुक्त सो. यांनी सांगितले की, नविन प्रस्तावित गंगापुर व पिंपळगांव खांब मधील मलशुध्दीकरण केंद्र 10 mg/lit BOD या मानकांनुसार बांधण्यात येत आहेत. तसेच असित्वातील मलनि:सारण केंद्राचे Upgradation & Retrofitting करतांना BOD, 10 mg/lit च्या मानकानुसार ठेवण्याचा नाशिक मनपा conscious decision घेत आहे. असे मा. आयुक्त सो. यांनी सांगितले. सदर रेट्रो फिटींग व अपग्रेडेशनचे काम करतांना मनपाने "निरी" चा सल्ला घ्यावाअसे देखील निर्देश दिले.

त्यानंतर "निरी" ने त्यांच्या शिफारशींबाबत सादरीकरण केले. त्यामध्ये सिवरेज ऑडीट बददल माहिती देतांना मा. आयुक्त सो. यांनी सांगितले की, नविन प्रस्तावित ऑपरेशन व

नेटवर्कच्या कामांमध्ये पर्जन्यवाहिकेला जोडले गेलेले सांडपाणी मुख्य मलवाहिकेस जोडणेची बाब अंतर्भुत केली आहे. तसेच सदर सिवरेज नेटवर्क कनेक्शन एफिशियन्सी १००% करण्याचा दृष्टीकोनातुन नाशिक मनपाने सन २०१८-१९ च्या अर्थसंकल्पात अंतर्भाव केला असुन सन २०२० पर्यंत १००% कव्हरेज करण्यात येईल. तसेच अस्तित्वात असलेले मलशुध्दीकरण केंद्र upgradation retrofitting मध्ये सद्यस्थितीतील foam problem देखील नियंत्रणात आणला जाईल.

निरीचे डॉ. राकेशकुमार यांनी स्पष्ट केले की, सद्यस्थितीत नाशिक शहरामध्ये प्रत्येक मिळकतीचे सांडपाणी त्यांच्या सेप्टीक टँक नंतर मलवाहीकेस जोडले आहे. त्यामुळे नाशिक मनपाच्या मलशुध्दीकरण केंद्रांवर Organic Loading कमी येते व ही बाब चांगली आहे. तथापि त्यांनी सुचविले की, यापुढे सेप्टीक टँक बांधतांना IITBombay यांनी शिफारस केलेल्या पॅटर्न नुसार बांधकाम करणेबाबत नागरीकांना अवगत करावे. मा.आयुक्त सो. यांनी निर्देश दिले की, यापुढे नाशिक मध्ये Septic Tank बांधतांना IITBombay यांनी शिफारस केलेल्या पॅटर्न नुसार Septic Tank बांधण्या बाबत नागरिकांना अवगत करण्यात यावे.

श्री. राजेश पंडित यांचे विनंती नुसार नंदिनी नदी पात्रामधील होर्डींग्जचे फाऊंडेशन त्वरीत हटविणे बाबत अतिक्रमण विभागाला निर्देश दिले. तसेच Rain Water Harvesting अधिक परिणामकारक पध्दतीने करण्या बाबत ADTP यांनी कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

मा. आयुक्त सो. यांनी निर्देश दिले की, प्रक्रिया केलेले सांडपाणी नदी पात्रात सोडणे बाबत जलसंपदा विभागाने कुठल्या वर्षा पर्यंत बंधनकारक केले आहे, त्याची माहिती घेणेत यावी. तसेच कपिला व सर्व उपनदयांवर नदीवर झालेल्या अतिक्रमणा बाबतची माहिती घेऊन नगररचना विभागाच्या मदतीने कार्यवाही करावी असे निर्देश दिले. तसेच गोदावरी व तीच्या उपनद्या यांच्या हददी निश्चित करणे बाबत जलसंपदा व Land Record विभागा मार्फत कार्यवाही करणे बाबत निर्देश दिले.

सदर बैठकीत मा. आयुक्त सो. यांनी माहिती दिली की, निरी या संस्थेने सुचविलेल्या जवळपास सर्वच मुद्यांची पुर्तता नाशिक महानगरपालिकेने केली आहे व करीत आहे. त्याच बरोबर मा.आयुक्त सो. यांनी नाशिक महानगरपालिकेच्या संबंधीत अधिकाऱ्यांना पुढिलप्रमाणे अंमलबजावणी करणे बाबत सुचना दिल्या.

| अ. क्र. | मुददा | कार्यवाही करणारा विभाग |
|---|---|---|
| १. | नाशिक मनपा हद्दीत Blue Line व Red Line येथे स्वयंस्पष्ट बोर्डस लावणेत यावे व सदर पुररेषेच्या हददीत बांधकामांना परवानग्या देऊ नये. | नगरनियोजन विभाग |
| २. | कपिला व सर्व उपनदयांवर नदीवर झालेल्या अतिक्रमणा बाबतची माहिती घेऊन नगररचना विभागाने कार्यवाही करावी असे निर्देश दिले. तसेच गोदावरी व तिच्या उपनद्या यांच्या हददी निश्चित करणे बाबत नगरनियोजन विभागाने DILR विभागा मार्फत कार्यवाही करणे बाबत निर्देश दिले. | नगरनियोजन विभाग व तालुका निरिक्षक भुमी अभिलेख विभाग |

| | |
|---|---|
| ३. रामकुंड येथे निर्माल्य कलश ठेवणेत आले आहे. त्याच बरोबर सदर ठिकाणी इतर कचरा टाकणेसाठी वेगळे डस्टबीन ठेवणेत यावे. | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| ४. गोदावरी पात्रात केलेले कॉंक्रिटीकरण काढण्याचे काम सद्यस्थितीत स्मार्ट सिटी मार्फत करणेत येत असुन, डॉ. प्राजक्ता बस्ते यांचे बरोबर बैठक घेऊन त्यांनी दिलेल्या सुचनांचा विचार करणेत यावा. | स्मार्ट सिटी विभाग |
| ५. Blue Line व Red Line चे क्षेत्रात यापुढे इंटरसेप्टींग सिवर बनवु नये. | सार्व. आरोग्य अभियांत्रिकी विभाग (मलनि:सारण) |
| ६. भविष्य काळात Sewerage lines निळ्या पुररेषेबाहेरील रस्त्याच्या पलिकडे करणे निश्चित केले. | नगरनियोजन विभाग व सार्व. आरोग्य अभियांत्रिकी विभाग (मलनि:सारण) |
| ७. नदी पात्रा मध्ये कुठल्याही प्रकारचे कॉंकिटी करण करण्यात येऊ नये. | नगरनियोजन व सार्व. बांधकाम विभाग |
| ८. नगरनियोजन विभागाने IITBombay यांचेकडून सेप्टीक टॅन्कच्या डिझाईन्स घ्याव्यात व यापुढे अशा डिझाईन्सच्या सेप्टीक टॅन्क बनविणे बाबत बंधनकारक करावे. | नगरनियोजन विभाग व सार्व.आरोग्य अभियांत्रिकी (मलनि:सारण) विभाग |
| ९. त्र्यंबकेश्वर येथे राष्ट्रीय हरीत लवादाच्या आदेशानुसार (अर्ज क्र. १४/२०१३) ज्या प्रमाणे पुरोहीत महासंघाने पुढाकार घेऊन निर्माल्य, पिंडदानाचे साहित्य यांची विल्हेवाट लावण्यासाठीची जबाबदारी स्विकारली आहे व Biomethanation Plant पर्यंत ते पोहोचविले जाते, तसे नाशिकला करण्यात यावे, अशी सुचना झाली. | घनकचरा व्यवस्थापन विभाग व पर्यावरण विभाग |
| १०. Rain Water Harvesting बंधनकारक करावे. | नगरनियोजन विभाग सार्व. बांधकाम विभाग |
| ११. श्री. राजेश पंडित यांनी मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जो कोणी नदी प्रदूषित करित असेल त्यावर "Bombay Police Act" नुसार फौजदारी कारवाई करण्यांत येईल असे मोठे मोठे फलक जागेजागी लावावे अशी मागणी केली व ती मा. आयुक्त साहेबांनी मान्य केली. | |
| १२. रामकुंड परिसरातील स्वच्छतेसाठी (Holy Stretch) मधील जीवरक्षकांची मदत घेण्यात यावी, व स्थानिक Stakeholders ना विश्वासात घ्यावे आणि प्रबोधनाचे काम करण्यांत यावे. | पर्यावरण विभाग व घनकचरा व्यवस्थापन |

| | |
|---|---|
| १३. इथुन पुढे गोदावरी व तिच्या सर्व उपनद्या यांच्या बाबत कुठलेही रिटेनिंग वॉलचे बांधकाम हे "गॅबीयन" पध्दतीने करणेबाबत निर्देश दिले. | नगररचना विभाग व सार्व. बांधकाम विभाग |
| १४. अस्तित्वातील मलनि:सारण केंद्राचे Upgradation & Retrofitting करतांना BOD. 10 mg/lit च्या मानकानुसार ठेवण्याबाबत रेट्रो फिटींग व अपग्रेडेशनचे काम करतांना मनपाने "निरी" चा सल्ला घ्यावा असे निर्देश दिले. | सार्व. आरोग्य अभियांत्रिकी विभाग (मलनि:सारण) |

उपरोक्त् प्रमाणे बैठकीत चर्चा करुन बैठक समाप्त करण्यात आली.

आयुक्त
नाशिक महानगरपालिका, नाशिक